महाराष्ट्र शासन
इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर - ४४० ०२२
दुरध्वनी क्र. ०७१२-२८७०१२०/२१ CIN - U85300PN2019NPL187405 ई-मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र.महाज्योती/नागपूर/आस्था/४३२/२०२५-२६ दि. १०/०३/२०२६

# परिपत्रक

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षण २०२५-२६ करीता चौथी प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याबाबत.**

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महाज्योती संस्थेमार्फत राबिण्यात येणाऱ्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग (राज्यसेवा) परीक्षा पूर्व प्रशिक्षणाकरिता पात्र विद्यार्थांची निवड व प्रतिक्षा तसेच विस्तारित यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करून निवड झालेल्या विद्यार्थांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत रुजू होण्याकरिता वेळोवेळी मुदत देण्यात आलेली होती तसेच जे विद्यार्थी प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विध्यार्थांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थांची निवड करण्यात येईल असे देखील कळविण्यात आलेले होते.

त्यानुसार संबंधित प्रशिक्षण संस्थेमार्फत प्राप्त अहवालानुसार आतापर्यंत प्रसिध्द करण्यात आलेल्या निवड व प्रतिक्षा तसेच विस्तारित यादीतील निवड झालेल्या विद्यार्थापैकी ज्या विद्यार्थांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण केलेली नाही अश्या विद्यार्थांच्या ऐवजी पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थांची निवड करण्यात येत असून सदर प्रशिक्षणाकरिता चौथी प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच निवड झालेल्या विद्यार्थांना संबंधित प्रशिक्षण संस्थेत दि.१५/०३/२०२६ रोजी पर्यंत रुजू होण्याकरिता सूचना निर्गमित करण्यात येत आहे. **जे विद्यार्थी दि.१५/०३/२०२६ रोजी पर्यंत प्रशिक्षण संस्थेत रुजू होणार नाही अश्या विद्यार्थांचे प्रवेश रद्द करून पुढील प्रतिक्षा यादीतील विद्यार्थांची निवड करण्यात येईल.** सर्व संबंधित विद्यार्थांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा**
**(मिलिंद नारिंगे)**
**व्यवस्थापकीय संचालक**
**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर**